# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## निम्नस्तर कृषि शिक्षण विद्याशाखा

## कृषि पदविका प्रवेश माहिती पुस्तिका

## शैक्षणिक वर्ष २०२५–२०२६

## कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्षे कालावधी- मराठी माध्यम)

## प्रवेश प्रक्रिया

ई-मेल : adlae@pdkv.ac.in

दूरध्वनी : 0724-2258706

वेबसाईट : pdkv.ac.in

दि. ०२/०६/२०२५ रोजी प्रकाशित.

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला



| अ.क्र. | पदाधिकारी | नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संचालक(शिक्षण ) तथा अधिष्ठाता (कृषी) | **डॉ. एस. एस. माने** | ०७२४-२२५८०९३ |
| २ | कुलसचिव | **डॉ. एस. के. ठाकरे** | ०७२४-२२५८३७२ |
| ३ | अधिष्ठाता (निम्न कृषी शिक्षण विद्याशाखा) | **डॉ. आर. एन. काटकर** | ०७२४-२२५८७०६ |
| ४ | सहयोगी अधिष्ठाता (निम्न कृषी शिक्षण विद्याशाखा) | **डॉ. आर. एन. काटकर** | ०७२४-२२५८७०६ |
| ५ | उपकुलसचिव (विद्या) | **डॉ. एस. के. ठाकरे** | ०७२४-२२५८३४८ |
| | **संकेतस्थळ : www.pdkv.ac.in** | | |

# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

## कृषी पदविका प्रवेश माहिती पुस्तिका ~ २०२५-२६

### १. प्रस्तावना

**१.१** आधुनिक शिक्षणाच्या संकल्पनेनुसार युवक युवतीनी कृषि व्यवस्थापनाबरोबर दैनंदिन जीवनाला कसे सामोरे जावे हे शिक्षण निम्नस्तर कृषी शिक्षण अभ्यासांतर्गत शिकविले जाते. पीक उत्पादन, पिकांचे किड व रोग व्यवस्थापन, गांडूळ खत व सेंद्रिय खत निर्मिती, शेळी पालन, दुग्धव्यवसाय, फलोत्पादन, पशुसंवर्धन, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, रेशीमउत्पादन, कृषी व्यवस्थापन, विपणन व मत्सव्यवसाय प्रशिक्षणाद्वारे व त्याचबरोबर प्रात्यक्षिकाद्वारे व्यवसायाभिमुख शिक्षण या सर्व विद्यापीठांतर्गत युवक व युवतींना दिले जाते. या सगळया मार्गदर्शनामुळे विविध कार्याची आखणी कशी करावी? कमी वेळात योग्य ती कृती करुन केलेल्या कामाची उद्दिष्टे कशी साध्य करावीत? अशा या सगळया आखणीचा परिणाम काय होतो. हे सगळे अनुभव हे विद्यार्थी या शिक्षणातून घेतात. या सगळया विद्यापीठाच्या माध्यमातून योग्य उत्पादन निर्माण करुन त्याच्या विक्रीपर्यंतचे सगळे प्रगत तंत्रज्ञान शिकवले जाते आणि त्यामुळे आधुनिक पध्दतीने कृषी क्षेत्रात पारंगतता वाढविण्याचा प्रयत्न केला जातो.

महाराष्ट्राच्या विदर्भ प्रदेशातील शेतकऱ्यांच्या शेती विषयक अनेक गरजा भागविण्यासाठी तसेच वेळोवेळीच्या शेतात येणाऱ्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने दि. २० ऑक्टोबर १९६९ रोजी डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाची, अकोला मुख्यालयी स्थापना केली. विदर्भामध्ये एकुण ११ जिल्हे असून त्यांची प्रशासकिय सुविधेसाठी दोन विभागात विभागणी केली आहे. अमरावती विभागात अमरावती, अकोला, वाशीम, बुलडाणा व यवतमाळ असे एकुण ५ जिल्हे येतात तर नागपूर विभागात नागपूर, वर्धा, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया व गडचिरोली असे एकुण ६ जिल्हे येतात. विदर्भाचे एकुण ११ जिल्हयाचे भौगोलिक ९७.२३ लाख हेक्टर असून त्यातील ६४.२५ लाख हेक्टर क्षेत्र लागवडीखाली आहे. डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचे शिक्षण, संशोधन आणि विस्तार हे तिन अंतर्भूत विभाग आहेत. शिक्षण क्षेत्राअंतर्गत निम्नस्तर कृषि शिक्षण हि त्यातील एक विद्याशाखा असून या शाखेच्या अधिपत्याखाली संपूर्ण विदर्भात एकुण ८ शासकिय घटक, अनुदानित १ संलग्न व ४८ खाजगी कायम विना अनुदानित कृषि तंत्र विद्यालये कार्यरत आहेत. कृषि तंत्र विद्यालयांची यादी या माहिती पुस्तीकेत दिलेली आहे.

**१.२** कृषी विद्यापीठांची मागणी आणि कृषी व पदुम विभाग, शासन निर्णय दि.३०/५/२०१८ मधील सूचना विचारात घेऊन कृषी परिषदेच्या ९८ व्या बैठकीमध्ये पारीत केलेल्या ठराव क्र.०४/९८/२०१९ नुसार कृषि पदविका अभ्यासक्रमाची प्रवेश प्रक्रिया २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून कृषी विद्यापीठाच्या नियंत्रणाखाली राबविण्यात येत आहे.

## १.३ कृषी विद्यापीठांचे कार्यक्षेत्र

| अ.क्र | कृषी विद्यापीठांचे नाव | कार्यक्षेत्रांतर्गत जिल्हे |
|---|---|---|
| १ | डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला - ४४४१०४ (महाराष्ट्र) | अकोला, अमरावती, यवतमाळ, वाशीम, बुलडाणा, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदीया, गडचिरोली व चंद्रपूर |

## १.४ पदविका अभ्यासक्रम, कालावधी आणि पात्रता

| अ. क्र. | अभ्यासक्रम | कालावधी | पात्रता |
|---|---|---|---|
| १) | कृषी तंत्र पदविका (मराठी माध्यम) | २ वर्षे | उमेदवार महाराष्ट्रातील माध्यमिक व उच्च माध्यमिक शालान्त परीक्षा मंडळाची माध्यमिक शालान्त परीक्षा (इ. १० वी ) किंवा समकक्ष परीक्षा उत्तीर्ण. |

## २. कृषी तंत्र पदविका (२ वर्षे - मराठी माध्यम)- घटक अनुदानित कृषी तंत्र विद्यालये

### २.१ डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला - घटक अनुदानित कृषी तंत्र विद्यालये

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतिक क्रमांक | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | १२०१ | **श्री. वामन वि. मोरे**<br>श्रीमती आंनदीबाई मालोकार कृषी तंत्र विद्यालय, निंबी (मालोकार) ता.अकोला, जि. अकोला | ६० | ९२८४६५८८९१ | atsnimbi@gmail.com | अकोला व वाशिम |
| २ | १२०२ | **डॉ. सतिशचंद्र मा. जाधव**<br>कृषी तंत्र विद्यालय, बुलडाणा, जि. बुलडाणा | ६० | ९८५०३७३७६४ | atsbuldana@gmail.com | बुलडाणा |
| ३ | १२०३ | **डॉ. जीवन आर. कतोरे**<br>कृषी तंत्र विद्यालय, सेलसुरा, ता.देवळी, जि. वर्धा | ६० | ९९७००७०९४४ | atsselsura@gmail.com<br>atsselsura@pdkv.ac.in | वर्धा |
| ४ | १२०४ | **डॉ. एस.वाय. कडू**<br>कृषी तंत्र विद्यालय, सावंगी, पो. उपरवाही ता. कमळेश्वर जि.नागपूर | ६० | ७३८५०६०१४४ | atssawangi@pdkv.ac.in | नागपूर |
| ५ | १२०५ | **श्री.एम. व्हि. भोमटे**<br>कृषी तंत्र विद्यालय, हिवरा, पोष्ट रतनारा, ता.गोंदीया जि. गोंदीया | ६० | ९४०३४६५६८८ | ats_gondia@rediffmail.com | गोंदीया व भंडारा |
| ६ | १२०६ | **श्री. के. डी. दडमल**<br>कृषी तंत्र विद्यालय, मुल– मारोडा (सोमनाथ) ता. मुल, जि. चंद्रपूर | ६० | ८२७५४१८७८३ | atsmulmaroda@gmail.com | चंद्रपूर व गडचिरोली |
| ७ | १२०७ | **डॉ. बि. एम. मुराडी**<br>कृषी तंत्र विद्यालय, वरुड (पुसद), पोष्ट. मोहा, ता. पुसद, जि.यवतमाळ | ६० | ९६६५६३०२५१ | atswarud@pdkv.ac.in<br>ats_pusad@redifmail.com | यवतमाळ |

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतिक क्रमांक | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दुरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| ८ | १२०८ | **डॉ. ए. डी. मकेसर**<br>कृषी तंत्र विद्यालय, धारणी मोजे. कुसुमकोट (खुर्द) पोष्ट. - धारणी, ता.जि. अमरावती | ६० | ९६५७७२५८२१ | atsdharni@gmail.com | अमरावती |
| | | **संलग्न कृषी तंत्र विद्यालय** | | | | |
| ९ | १२०९ | **श्री. राजेश एस. खाडे**<br>जनता कृषी तंत्र विद्यालय, अमरावती, ता. अमरावती जि. अमरावती | ६० | ७३८५८८३१८१<br>९४२३४२५३४९ | jantaamravati4@gmail.com | अमरावती |

टिपः डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठांतर्गत असलेल्या फक्त **कृषी तंत्र विद्यालय, धारणी मौजे कुसुमकोट (खुर्द) ता.- धारणी जि. अमरावती** च्या प्रवेशाकरीता उमेदवार हा/ही मेळघाट विभागातील (तालुका-धारणी/ तालुका-चिखलदरा, जि. अमरावती) येथील रहिवाशी असणे बंधनकारक आहे.

# ३. कृषी तंत्र पदविका (२ वर्षे - मराठी माध्यम)- कायमस्वरुपी विना अनुदानित कृषी तंत्र विद्यालये

## ३.१ डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला - कायमस्वरुपी विना अनुदानित कृषी तंत्र विद्यालये

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतीक क्र | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | **जिल्हा- अकोला** | | | | |
| १. | १२१० | **श्री. एस. सी. ठाकुर**<br>ना. सौ. वसुधाताई देशमुख कृषी तंत्र विद्यालय, मुंडगाव, ता. अकोट, जि.अकोला | ६० | ९७६७८१२३८१ | vdkvmundgaon2000.@gmail.com | अकोला |

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतीक क्र | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| २. | १२११ | **श्री. सि. एन. मोहोड.**<br>द्वारकाबाई हुंडीवाले कृषी तंत्र विद्यालय, शिर्ला (अंधारे) ता. पातुर, जि. अकोला | ६० | ९८३७९८२५४३९ | principalshirlapoly@gmail. com | अकोला |
| **जिल्हा वाशिम** | | | | | | |
| ३. | १२१२ | **श्री. आर.पी. बोरकर**<br>श्री. आप्पास्वामी कृषी तंत्र विद्यालय, करडा, ता.रिसोड, जि. वाशिम | ६० | ८६०५७०७९०१<br>९५११२२१३९८ | appaswamiagri@gmail.com | वाशिम |
| ४. | १२१३ | **श्री. पुरूषोत्तम एम. चौधरी**<br>स्व. आप्पासाहेब देशमुख कृषी तंत्र विद्यालय, रोहणा (इजारा), ता. मानोरा, जि.वाशिम | ६० | ९९२२१५४४६४ | lateadagripolyrohana@gmail. com | वाशिम |
| ५. | १२१४ | **श्री. अंकुश प्रल्हाद वाठोरे**<br>कर्मयोगी बाबारावजी जोगदंड कृषी तंत्र विद्यालय, आमखेडा ता.मालेगाव, जि.वाशिम | ६० | ९५८८४६२१८९ | agripolyamkheda@gmail. com | वाशिम |
| ६. | १२१५ | **श्री. एन. एस. गोळे**<br>श्रीमती प्रभाताई राव कृषी तंत्र विद्यालय, मेडशी ता.मालेगाव, जि.वाशिम | ६० | ९९२२८५४९४६ | principalmedshi@gmail. com | वाशिम |
| ७. | १२१६ | **श्री.मनोज गौतम गायकवाड**<br>स्व. यशवंत देशमुख कृषी तंत्र विद्यालय, कवठळ, ता. मंगरुळपीर, जि. वाशिम | ६० | ९०११४७०८१८ | principal.ydknk@gmail.com | वाशीम |
| **जिल्हा--नागपूर** | | | | | | |
| ८. | १२१७ | **श्री. एस. जी. मोहोड,**<br>भैयाजी किनखेडे कृषी तंत्र विद्यालय, पिंपळा-किनखेडे. ता.कळमेश्वर, जि. नागपूर | ६० | ९७६४७९२१४४ | bkatschool@gmail.com | नागपूर |

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतीक क्र | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| ९. | १२१८ | **श्री. आनंद एच. आठवले**<br>राणी लक्ष्मीबाई कृषी तंत्र विद्यालय, सावरगांव, ता.नरखेड, जि.नागपूर | ६० | ९८३४३१२९९७ | rlktn.sawargaon@gmail.com | नागपूर |
| १०. | १२१९ | **श्री.डी. के. ढोमणे**<br>कृषी तंत्र विद्यालय, मोंढा ता. हिंगणा, जि. नागपूर | ६० | ८३९०६३३२६४ | atsmondha@rediffmail.com | नागपूर |
| ११. | १२२० | **श्री. पी. एन. झाडे**<br>शिवशंकर कृषी तंत्र विद्यालय, बेसूर ता. भिवापूर, जि. नागपूर | ६० | ८८३०२६५४९६<br>९४२२८१७८०४ | shivshankaratsbesur@gmail.com | नागपूर |
| १२. | १२२१ | **श्री. जी. एल. वालदे**<br>कृषी तंत्र विद्यालय, दहेगांव (जोशी) ता.पारशिवणी, जि. नागपूर | ६० | ८४५९१०६५३०<br>९६३७७७२६५८ | atsdahegaon@gmail.com | नागपूर |
| | | **जिल्हा बुलडाणा** | | | | |
| १३. | १२२२ | **श्री. एस. बी. मेहेत्रे,**<br>जिजामाता कृषी तंत्र विद्यालय, सिंदखेड राजा, ता. सिंदखेड राजा जि. बुलडाणा | ६० | ८०८७२८०५२९<br>७८७५९९४१२० | jijamatakrushividyalaya@gmail.com | बुलडाणा |
| १४. | १२२३ | **श्री. वामनराव राजाराम मैसने**<br>महालक्ष्मी कृषी तंत्र विद्यालय, माटरगांव (बु.) ता. शेंगांव, जि.बुलडाणा | ६० | ९२८४५३८४७७ | mahalaxmiktnm@gmail.com | बुलडाणा |
| १५. | १२२४ | **श्री. पी. जे. कपाटे**<br>सौ. प्रमिलाताई तेजराव देशमुख कृषी तंत्र विद्यालय, अमडापूर, ता. चिखली, जि. बुलडाणा | ६० | ९०११३९६९११ | kapateagri@rediffmail.com | बुलडाणा |
| १६. | १२२५ | **श्री. एस. टी. जाधव**<br>कृषी तंत्र विद्यालय मलकापूर (सें. रेल्वे), ता.मलकापूर (सें. रेल्वे) जि. बुलडाणा | ६० | ९८९०७२१४३० | malkapuragripolytechnic@gmail.com | बुलडाणा |

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतीक क्र | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| १७. | १२२६ | **श्री. एस. एस. चव्हाण**<br>महात्मा फुले कृषी तंत्र विद्यालय, देऊळगावराजा, ता. देऊळगावराजा जि. बुलडाणा | ६० | ९९७०८८६००८ | mpagripolydraja@gmail.com | बुलडाणा |
| १८. | १२२७ | **श्री. प्रवीण एस. हेरोळे**<br>शरद पवार कृषी तंत्र विद्यालय, जळगांव (जामोद) ता. जळगांव जामोद जि. बुलडाणा | ६० | ९०९६१३५५१२<br>९९७०७०३९७० | spagripolyjalgaonjalgaonjamod@gmail.com | बुलडाणा |
| **जिल्हा- अमरावती** | | | | | | |
| १९. | १२२८ | **श्री. के. डब्लू. लोखंडे**<br>जे.डी. पाटील कृषी तंत्र विद्यालय, सांगळूद ता. दर्यापूर, जि.अमरावती | ६० | ९५०३४६५५०२<br>८८८८६०३२६० | jdpatilagri@gmail.com | अमरावती |
| २०. | १२२९ | **श्री. विजय काशिराव अडोकर**<br>कृषी तंत्र विद्यालय, ब्राम्हणवाडी थडी, ता. चांदुरबाजार, जि. अमरावती | ६० | ९५५२१७७७३७ | ktnbramhanwadathadi@gmail.com | अमरावती |
| २१. | १२३० | श्री. अक्षय विकास औंधकर<br>स्व. पंजाबराव यावलीकर कृषी तंत्र विद्यालय, यावली (शहिद) ता. जि.अमरावती | ६० | ८८०६६८५०८५ | agripolyyawali@gmail.com | अमरावती |
| २२. | १२३१ | **श्री. स्वप्निल अ. काळे**<br>कृषी तंत्र विद्यालय, भिलोना, ता.अचलपूर, जि.अमरावती | ६० | ९९२१५५९५११ | aptbhilona@gmail.com | अमरावती |
| २३. | १२३२ | **श्री. सि. व्हि. काळे**<br>कृषि तंत्र विद्यालय, सावनेर, ता.नांदगाव खंडेश्वर जि. अमरावती | ६० | ७७०९१५९९६३<br>८८८८७४१४४५ | agripolysaoner@gmail.com | अमरावती |

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतीक क्र | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| २४. | १२३३ | **डॉ. व्हि.व्हि. बारस्कर**<br>स्व. पंजाबराव ठाकरे कृषी तंत्र विद्यालय, हातुर्णा, ता. वरुड, जि.अमरावती | ६० | ८२०८८४८९४७ | peteruprao1967@gmail.com | अमरावती |
| २५. | १२३४ | **श्री. आर. ई. पंचवटे**<br>कृषी तंत्र विद्यालय, चिंचोली खुर्द (रहिमापूर), ता.अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती | ६० | ९७३०९१०९९५ | krushitantraniketanchincholir@gmail.com | अमरावती |
| | | **जिल्हा- गोंदिया** | | | | |
| २६. | १२३५ | **श्री. वाय. के. टेंभरे**<br>गंगाई कृषी तंत्र विद्यालय, तिडका, ता. अर्जुनी सडक जि. गोंदिया | ६० | ९८२३८९१९१३ | gangaiagripoly@gmail.com | गोंदिया |
| २७. | १२३६ | **कु. वैशाली पी. गजभिये**<br>आदर्श कृषी तंत्र विद्यालय, धाबेटेकडी, ता.अर्जुनी मोरेगांव जि.गोंदिया | ६० | **९८३४४९५८४५** | aktndhabetekadi13@gmail.com | गोंदिया |
| | | **जिल्हा- यवतमाळ** | | | | |
| २८. | १२३७ | **श्री. प्रशिक प्रकाशराव वाहुरवाघ**<br>डॉ. आप्पासाहेब पवार कृषी तंत्र विद्यालय, कोंघारा, पो. पिपरी ता. केळापूर, जि.यवतमाळ | ६० | ९०९६२३०७१६ | apap.konghara@gmail.com<br>prashikwahurwagh9@gmail.com | यवतमाळ |
| २९. | १२३८ | **श्री. पि. व्ही. ठाकरे**<br>स्व. सुर्यभानजी बच्चेवार कृषी तंत्र विद्यालय, अंबोडा, पो. कवठा बाजार ता. आर्णी जि.यवतमाळ | ६० | ९१६८५५११०८ | sbagripoly.amboda@gmail.com | यवतमाळ |
| ३०. | १२३९ | **कु. मनीषा व्ही. वाढई**<br>स्व. उत्तमराव देशमुख कृषी तंत्र विद्यालय, दिग्रस, जि. यवतमाळ | ६० | ८९९९३४८२९<br>९७६५६२७८०६ | agricollegedigras@gmail.com | यवतमाळ |

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतीक क्र | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| ३१. | १२४० | **श्री. विजय फु. चव्हाण**<br>शेतीनिष्ठ परशराम पाटील कृषी तंत्र विद्यालय , देवगीरी (चिंतामणी), ता. दारव्हा, जि. यवतमाळ | ६० | ८८०५७६३७१० | sppktniketan@gmail.com | यवतमाळ |
| ३२. | १२४१ | **श्री. डी. यु. चिव्हाणे**<br>कृषी तंत्र विद्यालय, उमरी , ता. कळंब, जि.यवतमाळ | ६० | ९४२२५५३८९१ | agripolyumri@gmail.com | यवतमाळ |
| ३३. | १२४२ | **कु. सुनंदा व्ही. गुज्जरवार**<br>स्व. भाऊसाहेब माने कृषी तंत्र विद्यालय, ब्राम्हणगांव, ता. उमरखेड, जि. यवतमाळ | ६० | ९७६३०४८००४<br>९१७२४६६९९४ | bmagriplg@gmail.com | यवतमाळ |
| ३४. | १२४३ | **श्री. ए. आर. लालसरे**<br>कृषी तंत्र विद्यालय, बुरांडा (ख) ता.मारेगाव जि.यवतमाळ | ६० | ९७६७४६२२७८<br>७०२०५४५५७६ | aptburanda@gmail.com | यवतमाळ |
| | | **जिल्हा--भंडारा** | | | | |
| ३५. | १२४४ | **श्री. जि. एम. कोठेकर**<br>कृषी तंत्र विद्यालय, निष्टी, ता. पवनी जि. भंडारा | ६० | ९९६०४७८६५७ | ktnnishti@gmail.com | भंडारा |
| ३६. | १२४५ | **कु. वैशाली पी. काळे**<br>देविदासजी कठाणे (पाटील) कृषी तंत्र विद्यालय, मुरमाडी (तुपकर) ता. लाखनी जि. भंडारा | ६० | ९६३७९५५८१३<br>९४२४८११३५४ | dkpatsmurmadi@gmail.com | भंडारा |
| ३७. | १२४६ | **सौ. प्रीती एस. पाटील**<br>श्री. संत गजानन महाराज कृषी तंत्र विद्यालय, कांद्री ता. मोहाडी, जि.भंडारा | ६० | ९४२१८०००१४ | ssgmkvkandri@gmail.com | भंडारा |
| | | **जिल्हा- चंद्रपूर** | | | | |
| ३८. | १२४८ | **श्री. अनिल गजाननराव पोटे**<br>शिक्षण महर्षि स्व. श्रीहरी जीवतोडे कृषी तंत्र विद्यालय, नंदोरी (बु) ता. भद्रावती जि. चंद्रपूर | ६० | ९५०३५६७७१७<br>८९७५५०७८४६ | atsnanduri@gmail.com | चंद्रपूर |

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतीक क्र | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| ३९. | १२४९ | **कु. आयेशा सि. शेंडे**<br>श्री. दत्तात्रय प्रभु कृषी तंत्र विद्यालय, तळोधी, (बाळापूर) ता. नागभीड, जि. चंद्रपूर | ६० | ७०३०५६९१५५ | shridattatrayacollege@gmail.com | चंद्रपूर |
| ४०. | १२५० | **कु. रेशमा एम. रफी शैख**<br>स्व. राजीव गांधी कृषी तंत्र विद्यालय, चौगान, ता.ब्रम्हपुरी जि. चंद्रपूर | ६० | ९०७५८५७३८६ | agripolychaugan@gmail.com | चंद्रपूर |
| ४१. | १२५१ | श्री. **व्हि. एस. पोडे**<br>सुरभी कृषी तंत्र विद्यालय, सावली, ता. सावली, जि. चंद्रपूर | ६० | ९४०३१४५७३० | Surbhitech2015@rediffmail.com | चंद्रपूर |
| ४२. | १२५२ | **सौ. हर्षदा सुहास पोतदार**<br>आनंदवन कृषी तंत्र विद्यालय, आनंदवन वरोरा, ता. वरोरा, जि.चंद्रपूर | ६० | ९८५०१३५११०<br>**९३२२४३९८१९** | anandwan.ats@gmail.com | चंद्रपूर |
| **जिल्हा गडचिरोली** | | | | | | |
| ४३. | १२५३ | **श्री. शेषराव एन. गजघाटे**<br>श्रीमती अंबाबाई खोब्रागडे कृषि तंत्र विद्यालय, ता. आरमोरी, जि. गडचिरोली | ६० | ९७६४२७१४५५ | smtambabaikhobragade@gmail.com | गडचिरोली |
| ४४. | १२५४ | **श्री. विनोद पी. तिडके**<br>गोंडवाना कृषि तंत्र विद्यालय, आलापल्ली, ता.अहेरी, जि.गडचिरोली | ६० | ७०२०४८३९०३ | gondwanaagri@gmail.com | गडचिरोली |
| ४५. | १२५५ | **कु. राजश्री बि. कांबळे**<br>कृषी तंत्र विद्यालय, शंकरपूर, ता. देसाईगंज, जि.गडचिरोली | ६० | ९३०९९९८२०१ | agripolyshankarpur@gmail.com | गडचिरोली |

| अ. क्र. | विद्यालयाच्या विकल्पाचे सांकेतीक क्र | कृषी तंत्र विद्यालयांचे व प्राचार्यांचे नांव | प्रवेश क्षमता | दूरध्वनी /भ्रमणध्वनी क्रमांक | ई-मेल | ज्या जिल्हयांशी मर्यादित आहे त्या जिल्हयांचे नांव |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | जिल्हा वर्धा | | | |
| ४६. | १२५६ | **श्री. प्रशांत देशमुख**<br>स्व. सुमतीबाई वाघ कृषी तंत्र विद्यालय, खरांगणा (गोडे), ता. जि. वर्धा | ६० | ९९२१५६५७६८<br>८२०८९२५९१६ | swa.s.waghktn@gmail.com | वर्धा |
| ४७. | १२५७ | **श्री. अविनाश नामदेवराव चौखे**<br>श्री. संत ब-हाणपुरे महाराज कृषी तंत्र विद्यालय, मांडगाव, ता. समुद्रपूर जि.वर्धा | ६० | ८६६८३३२६०८ | bmagripoly@gmail.com | वर्धा |
| ४८. | १२५८ | **श्री. संजय पंजाबराव कुडे**<br>अभिनव कृषी तंत्र विद्यालय, हिंगणी ता. सेलु जि.वर्धा | ६० | ९८६०७०९५२० | Sanjaypk1234@rediffmail.com<br>abhinavatshigni@gmail.com | वर्धा |

## ४. कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रम (२ वर्षे मराठी माध्यम)

### ४.१ उद्देश

- शेतकरी व शेत मजुरांच्या मुलांना कृषी व तत्सम विषयांचे प्रात्यक्षिकाभिमुख शिक्षण देऊन त्यांचा आत्मविश्वास वाढविणे, ज्यामुळे विद्यार्थी स्वतःची शेती करण्यास प्रवृत्त होऊन सुधारीत तंत्रज्ञानाच्या वापराने कृषी उत्पादन वाढेल.
- कृषी तंत्र पदविकाधारकास कृषी पूरक स्वयंरोजगाराभिमुख उद्योगाद्वारे स्वतःच्या रोजगाराची निर्मिती करुन स्वावलंबी होता येईल व त्याद्वारे इतरांना देखील रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देता येतील.
- कृषी पदविकाधारक इतर शेतकऱ्यांना मार्गदर्शक म्हणून कार्य करतील.
- कृषी पदविकाधारकास कृषी सहाय्यक/कृषिसेवक/ग्रामसेवक म्हणून शासकीय अथवा खाजगी क्षेत्रात सेवा करता येईल.

### ४.२ शैक्षणिक कालावधी

- कृषी तंत्र पदविका हा दोन वर्षीय मराठी माध्यमातील पूर्णवेळ अभ्यासक्रम आहे.

### ४.३ कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रमाबाबत सूचना :

- उमेदवार विदर्भ व प्रशासकिय विभागातील रहिवाशी असावा. विद्यार्थ्यांना प्रवेश रहिवाशी जिल्हानिहाय दिला जाईल.

## ५. कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश अर्ज भरण्याबाबत उमेदवारांसाठी सूचना.

**५.१** प्रत्येक उमेदवाराने मान्यताप्राप्त शैक्षणिक पात्रतेनुसार दिलेल्या संकेतस्थळावर **फक्त एकच** प्रवेश अर्ज 'डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला' च्या **'www.pdkv.ac.in'** या संकेतस्थळावरील लिंक वर **'ऑन लाईन'** पध्दतीने भरावा. उमेदवाराने एकापेक्षा जास्त प्रवेश अर्ज संकेतस्थळावर दाखल केल्यास शेवटचा दाखल केलेला प्रवेश अर्ज ग्राह्य धरण्यात येईल.

**५.२ प्रवेश अर्जाची प्रत** किं**वा इतर कोणतीही कागदपत्रे टपालाने / कुरीअरने किंवा स्वतः/ईतराद्वारे, कृषी विद्यापीठ किंवा मे. इन्फिन्नटी इफिोवे, प्रा. लि, राजकोट यापैकी कोठेही पाठवू नयेत.**

**५.३** संकेतस्थळावर प्रवेश अर्ज भरल्यानंतर स्वाक्षरी, उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र आणि आवश्यक त्या सर्व कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात. **'www.pdkv.ac.in'** संकेतस्थळावर लिंक उपलब्ध आहे.

५.४ **खुल्या उमेदवारांसाठी रु. ५००/- तर आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांसाठी रु.२५०/- प्रवेश अर्ज शुल्क आहे. सदरचे शुल्क नेट बँकींग, डेबिट कार्ड किंवा क्रेडीट कार्ड द्वारे भरावे.**

**प्रवेश अर्ज भरल्यानंतर असे शुल्क भरण्याची व्यवस्था संकेतस्थळावर केलेली आहे. सदरचे शुल्क ना परतावा आहे.**

**५.५** कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रमासाठी प्रथम वर्षात प्रवेश घेणाऱ्या उमेदवारांचे वय दिनांक ०१/०७/२०२५ रोजी १४ ते ३० वर्षाचे दरम्यान असले पाहिजे व उमेदवार माजी सैनिक असल्यास त्यांचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे.

**उमेदवाराने अर्जासोबत खाली दर्शविलेल्या कागदपत्रांच्या प्रती स्कॅन करून संकेतस्थळावर अपलोड कराव्यात.**

५.६ **इयत्ता १० वी चे गुणपत्रक (प्रमाणपत्र): उमेदवार हा ईयता १०वीत एकापेक्षा अधिक प्रयत्नात उतिर्ण झाला असल्यास ती सर्व गुणपत्रके जोडणे आवश्यक आहे.**

५.७ **विद्यालयाचा/ शाळा सोडल्याचा दाखला:** ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे त्या विद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर त्या विद्यालयाचे / महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafide certificate). परंतु एकदा प्रवेश घेतल्यानंतर उमेदवाराने ७ दिवसांच्या आत शाळा सोडल्याचा दाखला जेथे प्रवेश घेतला आहे तेथे सादर करणे बंधनकारक आहे. अन्यथा त्याचा प्रवेश रद्द होऊ शकतो. तसेच ज्या उमेदवाराचा इयत्ता १० वी, ११ वी, १२ वी नंतर प्रवेशासाठी काही कारणाने (शैक्षणिक) खंड पडला असेल तर त्या उमेदवारांनी त्यासंबंधीचे तहसीलदार यांच्या समोर रु.१००/- च्या स्टॅम्प पेपरवर केलेले प्रतिज्ञापत्रक (Gap certificate) सादर करणे आवश्यक आहे.

**रहिवासी प्रमाणपत्र (Domicile Certificate) तहसिलदार अथवा नायब तहसिलदार यांनी विहित नमुन्यात दिलेले रहिवाशी अधिवास प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.**

५.८ **विद्यार्थ्यांना १२ टक्के गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र प्रमाणपत्र :**

**५.८.१** **तलाठी / पटवारी यांनी सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ मध्ये दिलेला शेतजमिनीचा ७/१२ चा उतारा/ खसरा (गांव नमुना)** उमेदवारांच्या नावावर किंवा त्यांचे आई/ वडील किंवा त्यांचे आजी/ आजोबा यांच्या नावे असावा.

**५.८.२** यदाकदाचित आई / वडील हयात नसतील, तर सदर उतारा त्यांच्या कुटुंब प्रमुखाच्या नावावर असावा व या परिस्थितीत कुटुंब प्रमुखाचे **रु.१००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र असावे. प्रतिज्ञापत्रकामध्ये सदर उमेदवाराचा उक्त जमिनीमध्ये कायदेशीर हक्क असल्याचे नमूद करण्यात यावे.**

**५.८.३** सदर उतारा मराठी/हिंदी/इंग्रजी भाषेत नसेल तर **संबंधित राज्यातील राजपत्रित अधिकाऱ्याने प्रमाणित केलेले उताऱ्याचे अचूक भाषांतर केलेले असावे.**

**५.८.४** उमेदवाराच्या आईचा तिच्या वडीलांकडील शेतजमिनीत वाटा असल्याबाबतचे रु.१००/- च्या मुद्रांकावर तिच्या वडिलांचे प्रतिज्ञापत्र व

७/१२ उतारा अपलोड केल्यास, असा उमेदवार १२ गुणांचा अधिभार मिळण्यास पात्र राहील.

**५.८.५** उमेदवारास सूचित करण्यात येते की, ७/१२ उता-याच्या आवश्यक तेवढया सत्यप्रती प्रवेशाच्या वेळेस सोबत ठेवाव्यात.

**५.८.६** उमेदवाराच्या जमिनीच्या ७/१२ उता-यामध्ये नोंदविलेल्या नावापेक्षा त्याच्या/तिच्या इयत्ता १०/ १२ वी च्या गुणपत्रक व प्रमाणपत्रामध्ये असलेले नाव भिन्न असल्यास, अशा उमेदवाराने त्याबाबतचे प्रतिज्ञापत्रक सादर करणे बंधनकारक राहील.

**५.८.७** **भूमीहीन शेतमजूर असल्याबाबतचे प्रमाणपत्र :** उमेदवाराचे वडील/पालक भूमीहीन शेतमजूर असल्यास भूमीहीन शेतमजूराचे शेतमजूरी करणे हे उपजिविकेचे साधन असल्याचा उल्लेख प्रमाणपत्रात असणे जरुरीचे आहे. हे प्रमाणपत्र तहसिलदार अथवा नायब तहसिलदार यांचे सही शिक्क्यानिशी असावे. सदर प्रमाणपत्रधारक उमेदवार शेतकरी या प्रवर्गासाठी (AG Category) ठेवण्यात आलेल्या आरक्षणासाठी पात्र ठरणार नाही. सदर प्रमाणपत्राचा नमुना **परिशिष्ट "अे"** येथे देण्यात आला आहे.

**५.८.८** **शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र :** सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ या वर्षातील तहसीलदार अथवा नायब तहसीलदार यांनी दिलेले शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र, या प्रमाणपत्रात उमेदवार त्याचे /तिचे आई/ वडील अथवा आजी /आजोबा (वडीलांचे आई - वडील) हे जमीनधारक किंवा कूळ असून त्या जमिनीद्वारे मिळणारे उत्पन्न हेच त्या कुटुंबाच्या उपजिविकेचे प्रमुख साधन **परिशिष्ट "बी"** येथे देण्यात आला आहे. अशा प्रमाणपत्रधारकास शेतकरी प्रवर्ग लागू असेल.

**५.९** **जातीचे प्रमाणपत्र व उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र :** उपजिल्हाधिकारी /उपविभागीय / तहसीलदार/ तालुका दंडाधिकारी यांनी विहित नमुन्यामध्ये दिलेले जातीचे प्रमाणपत्र, विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड, इतर मागासवर्गीय व विशेष प्रवर्गातील उमेदवारांनी तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिका-यांनी दिनांक १-४-२०२५ रोजी किंवा ३१/०३/२०२६ पर्यंत वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे (नॉन क्रिमीलेअर) प्रमाणपत्र.

**५.१०** अनुसुचित जमातीच्या (एस.टी.) उमेदवारास प्रवेशाच्यावेळी गुणानुक्रमे संबंधीत प्रवर्गाला जात प्रमाणपत्रावर प्रवेश देण्यात येईल. जात वैधता प्रमाणपत्र अनिवार्य आहे. प्रवेशाच्या वेळी हे प्रमाणपत्र नसल्यास नसल्यास विहित संपूर्ण शुल्क भरावे लागेल.

**५.११** **प्रकल्पग्रस्त असल्याबाबतचा दाखला :** महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी (District Rehabilitation/Resettlement Officer) : यांनी उमदेवार/ वडील हे प्रकल्पग्रस्त आहेत व त्यांच्या/तिच्या वडिलांची/पालकांची किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील

कृषी विद्यापीठे/ पाटबंधारे/वीज/संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादित केलेली/झालेली आहे असे प्रमाणपत्र. अधिका-याने दिलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्यांना द्यायचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे.

५.१२ **राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) प्रमाणपत्र :** हवाईदल/ नौदल/स्थल सेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्काऊट गाईड तालुका समादेशक/ मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र छात्र सेना (एम.सी.सी) जिल्हा समादेशक अधिकारी/मुख्याध्यापक/ प्राचार्य/ यांनी दिलेले प्रमाणपत्र. (सदरचे प्रमाणपत्र इ. ८ वी ते १० वी या कालावधीतील असावे)

५.१३ **क्रीडा प्रमाणपत्र :** तालुका किंवा जिल्हा पातळीवरील तालुका / जिल्हा क्रीडा अधिका-यांने निर्गमित केलेले इ. ८ वी ते १० वी या कालावधीतील प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येईल. केवळ मुख्याध्यापकांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र ग्राहय धरण्यात येणार नाही. नोंदणीकृत क्रीडा असोसिएशनने प्राधिकृत केलेल्या क्रीडा स्पर्धेच्या प्रमाणपत्रावर तालुका / जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असल्यास अधिभार मिळेल.

५.१४ तालुका / जिल्हा स्तरावर सांस्कृतिक नैपुण्य / वादविवाद/ नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास इ. ८ वी ते १० वी या कालावधीतील **यासंबंधी शिक्षणाधिका-याचे प्रमाणपत्र ग्राह्य धरण्यात येईल.**

५.१५ स्वातंत्र्य सैनिकांसाठी असलेल्या आरक्षण सवलतीचा लाभ स्वातंत्र्य सैनिकांचे मुलगा/मुलगी किंवा मुलाचा/ मुलीचा, मुलगा/मुलगी यांना खालील अटीच्या अधीन राहून दिला जाईल. परंतु अशा परिस्थितीत **स्वातंत्र्य सैनिकाचे आणि जर स्वातंत्र्य सैनिक हयात नसल्यास स्वातंत्र्य सैनिकाच्या पती / पत्नीचे / नामनिर्देशित व्यक्ती चे रु.१००/- च्या मुद्रांकावर खालील मुद्यांचा समावेश असलेले प्रतिज्ञापत्र** संकेतस्थळावर अपलोड करावे लागेल.

- उमेदवार हा स्वातंत्र्य सैनिकाच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे.
- स्वातंत्र्य सैनिकाने हया सवतलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.
- स्वातंत्र्य सैनिकाने हया सवलतीचा जर आता उपयोग केला तर पुढे करणार नाही.

५.१६ **आजी/माजी सैनिक असल्याचे प्रमाणपत्र :** उमेदवाराचे वडील सैनिक असल्यास संबंधीत सैन्याधिकारी/ जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate. उमेदवार स्वतः सैनिक असल्यास संबंधित सैन्याधिकारी/जिल्हा सैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate. . (टिपः उमेदवार माजी सैनिक असल्यास त्याचे वय ४५ पेक्षा जास्त नसावे.)

५.१६ **कृषी विद्यापीठे/कृषी परिषदेचे कर्मचारी असल्याचे प्रमाणपत्र :** उमेदवाराचे पालक कृषी विद्यापीठे/कृषी परिषदेचे आजी/माजी अथवा मृत सेवक असल्यास संबंधीत कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिका-याचे प्रमाणपत्र.

**५.१७ अपंग/दिव्यांग असल्याचे प्रमाणपत्र :** अपंग/दिव्यांग वर्गवारीसाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक /वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र. स्वतःची वैद्यकीय तपासणी केल्याबाबतचा नोंदणीकृत वैद्यकीय अधिका-याचा दाखला (प्रवेशानंतर सादर केला तरी चालेल).

**५.१८ अनाथ प्रमाणपत्र :** आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटरहेड वरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे प्रमाणपत्र.

**उक्त अपलोड केलेल्या प्रतींच्या सत्यतेबाबत परिशिष्ट 'सी' येथील नमुन्यात स्वघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड करावे.**

**५.१९ स्कॅन करून अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय असावीत. याची खातरजमा करूनच कागदपत्रे अपलोड करावीत. अपलोड केलेली कागदपत्रे वाचनीय नसल्यास ते ग्राह्य धरण्यात येणार नाहीत व त्याची जबाबदारी पूर्णतः उमेदवाराची असेल.**

**५.२० सर्व दृष्टीने परिपूर्ण भरलेला तसेच प्रवेश वेळापत्रकात दिलेल्या शेवटच्या तारखेपर्यंत संकेतस्थळावर भरलेला अर्ज प्रवेशासाठी ग्राहय धरला जाईल.**

**५.२१ खालीलपैकी कोणत्याही एका त्रुटीमुळे प्रवेश अर्जाचा विचार न करता तो आपोआपच रद्द समजण्यात येईल.**

**५.२१.१ उमेदवाराचे पासपोर्ट आकाराचे सध्याचे छायाचित्र व स्वतःची स्वाक्षरी संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

**५.२१.२ पात्रता परीक्षेचे गुणपत्रकाची प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

**५.२१.३ संकेतस्थळावर अपलोड केलेल्या प्रतींच्या सत्यतेबाबत स्वयंघोषणापत्र संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

**५.२१.४ शाळा सोडल्याचा दाखला किंवा बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafied Certificate) ची प्रत संकेतस्थळावर अपलोड केली नसल्यास.**

**५.२१.५ विहीत वयोमयादेपेक्षा अधिक वय असल्यास**

**५.२१.६ अर्जासोबत जोडलेल्या प्रमणपत्रात खाडा खोड असल्यास**

**५.२१.७ सेवेत असणा-या उमेदवाराने संबंधित नियुक्ती प्राधिका-याचे 'ना हरकत प्रमाणपत्र'_संकेतस्थळावर अपलोड केले नसल्यास.**

**५.२१.८ प्रवेश अर्जाचे विहित शुल्क न भरल्यास.**

**५.२२** कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या प्रवेशाच्या वेळी किंवा गुणवत्ता यादी तयार करताना दोन किंवा त्यापेक्षा जास्त उमेदवारांना समसमान गुण असतील तर अशा उमेदवारांचा गुणवत्ताक्रम ठरविण्यासाठी खालील कार्यपध्दतीचा अनुक्रमे अवलंब करण्यात येईल.

**अ)** इयत्ता १० वी ची टक्केवारी

**ब)** कमीत कमी प्रयत्नात इयत्ता १० वी उत्तीर्ण झालेला उमेदवार.

**क)** वयाने मोठा असलेला उमेदवार.

**ड)**प्रथम ऑनलाईन प्रवेश अर्ज क्रमांक

## ६. प्रवेश कार्यपध्दती

६.१ प्राप्त झालेल्या प्रवेश अर्जावरुन **मे. इन्फिन्नटी इफीवे, प्रा. लि, राजकोट** जिल्हानिहाय तात्पुरती गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द करेल.

६.२ हरकत निवारण कृषी विद्यापीठाचे नियमानुसार होईल.

६.३ **जिल्हानिहाय तात्पुरती गुणवत्ता यादी संकेतस्थळावर प्रसिध्द झाल्यानंतर हरकत निवारण कालावधी (Grievence Redressal Period) सुरु होईल. तो सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याला संकेतस्थळावर log in द्वारे अपूर्ण कागदपत्रांची माहिती कळू शकेल.**

६.४ त्यानुसार तो विद्यार्थी त्याच्या 'log in' मध्ये 'documents upload' या बटणाद्वारे 'Grievence' या 'link' वर त्याची राहिलेली कागदपत्रे जोडू (documents upload) शकतो. सदर कागदपत्रांची छाननी करून ती योग्य असल्यास मान्य होतील अथवा नाकारण्यात येतील.

६.५ यानतंर प्रवेश अर्ज सादर केल्यानंतर कोणतीही अतिरीक्त कागदपत्रे कृषी विद्यापीठ किंवा ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविणाऱ्या संस्थेकडे स्वीकारली जाणार नाहीत.

६.६ या सर्व प्रक्रियेनंतर अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात येईल.

६.७ उमेदवारांना प्रवेश हा रहिवाशी जिल्हयानुसार दिला जाईल. प्रवेश प्रक्रिया ही संबंधीत कृषी तंत्र विद्यालयात राबविण्यात येईल. उमेदवार ज्या जिल्हयाचा कायम रहिवाशी आहे, तो त्या जिल्हयातील कृषी तंत्र विद्यालयात प्रवेशास पात्र राहील.

६.८ सक्षम प्राधिकाऱ्याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिकाऱ्याकडील जन्म दाखला यावरून उमेदवाराचा रहिवाशी जिल्हा निश्चित केला जाईल.

६.९ ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया राबविणाऱ्या संस्थेतर्फे सबंधीत कृषी तंत्र विद्यालयाच्या जिल्हानिहाय व विद्यालय निहाय गुणवत्ता यादया संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील. त्यामुळे प्रवेश कार्यक्रम व विद्यापीठ संकेतस्थळावरील सुचनांचे अनुपालन उमेदवाराने वेळेच्या मर्यादेत करणे आवश्यक आहे.

६.१० प्रवेश वाटप यादी प्रसिध्द झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यास प्रवेशाचे वाटप झालेले आहे त्या विद्यार्थ्याने **<u>'http://www.pdkv.ac.in'</u>** या संकेत स्थळावर स्वतःच्या login ID आणि Password देवून तात्पुरते प्रवेश पत्र (Allotment letter) प्राप्त करुन घ्यावे.

६.११ उमेदवाराने प्राप्त केलेले तात्पुरते प्रवेश पत्र, विहित प्रवेश शुल्क, मुळ कागदपत्रे (छायांकीत प्रती २ संचासह) व स्वतःचे पासपोर्ट आकाराचे छायाचित्र इत्यादीसह संबधित विद्यालयात प्रवेश पत्रात नमूद केलेल्या संबंधित कृषी तंत्र विद्यालयात स्वतःच उपस्थित राहावे.

६.१२ **कोणत्याही उमेदवाराची असा प्रवेश नाकारण्याची इच्छा असल्यास** आणि पुढील प्रवेश फेरीसाठी त्याचा/तिचा विचार व्हावा, असे वाटत असल्यास, **लॉग-इनमध्ये डेबीट कार्ड / क्रेडीट कार्ड / नेट बँकींग युपीआय (UPI) द्वारे रू.१००/- ऑनलाईन अदा करून प्रवेश नाकारावा.**

६.१३ **एखाद्या विद्यार्थ्याने रु.१००/- फी भरुन त्याचा / तिचा प्रवेश नाकारला नाही किंवा प्रवेश वाटपानुसार प्रवेशही घेतला नाही तर त्याचा / तिचा 'जागेवर प्रवेश फेरी' या फेरीखेरीज <u>नंतरच्या प्रवेश फेरीसाठी विचार केला जाणार नाही.</u>**

६.१४ प्रवेशित विद्यार्थी पुढील प्रवेश फे-यांद्वारे प्रवेशास पात्र असणार नाही. मात्र प्रवेश वाटपानुसार प्रवेश घेतल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या कालावधीमध्ये विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास / प्रवेश वाटप नाकारल्यास असा विद्यार्थी प्रवेश रद्द / नाकारलेला विकल्प वगळता पुढील ऑनलाईन प्रवेश फे-यांद्वारे इतर विकल्पांकरिता प्रवेशासाठी पात्र असेल. प्रवेश नाकारण्यासाठी दिलेल्या कालावधीमध्ये प्रवेश रद्द करता येतील.

६.१५ जिल्हयातील सर्व रिक्त जागांचा तपशील, प्रवेश प्रक्रियेची फेरी संपल्यानंतर कृषी तंत्र विद्यालय यांचे प्राचार्य, विद्यापीठाच्या घटक कृषी तंत्र विद्यालयाच्या प्राचार्यांकडे प्रवेशाच्या संबंधित कागदपत्रासह सादर करतील. **कृषी तंत्र विद्यालयाच्या प्राचार्यानी सर्व रिक्त जागांचा तपशील त्यांच्या विद्यालय लॉग-इनद्वारे संकेतस्थळावर अद्ययावत करावा.**

६.१६ पहिल्या फेरी नंतर रिक्त राहिलेल्या जागांसाठी प्रवर्ग बदलून शासकीय नियमानुसार दुसरी फेरी राबविण्यात येईल.

६.१७ पहिल्या व दुस-या फेरीद्वारे दिलेल्या प्रवेशाची कार्यवाही संबंधीत कृषी तंत्र विद्यालयात करण्यात येईल. तथापि, प्रवेशाची शेवटची फेरी ही विद्यापीठामध्ये / घटक कृषी तंत्र विद्यालयात कार्यक्रम पत्रिकेनुसार राबविली जाईल. या फेरीत जिल्हा बंदीची अट शिथील करुन <u>ऑनलाईन प्रणाली</u> द्वारे प्राप्त झालेल्या यादीनुसार उपस्थितामधून गुणानुक्रमे स्थळ प्रवेश फेरीत (स्पॉट ॲडमिशन) प्रवेश दिला जाईल.

६.१८ एखाद्या उमेदवाराला प्रवेश वाटपाबाबत तक्रार करायची असल्यास, संबंधित प्रवेश वाटप फेरीच्या कालावधीतच कृषी विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) यांच्याकडे उमेदवार तक्रार अर्ज दाखल करू शकेल. अशा तक्रारीबाबत तात्काळ शहानिशा करून यथायोग्य कार्यवाही करण्यास कृषी विद्यापीठाचे सहयोगी अधिष्ठाता (निकृशि) हे सक्षम असतील.

## ७. प्रवेश रद्द केल्यानंतर शुल्क परतावा :

- प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास विद्यार्थ्याकडून प्रवेश प्रक्रिया शुल्कापोटी कमाल रु.१०००/- रक्कम कपात करण्यात येईल.
- प्रवेशाची नोंदणी केल्यानंतर व वर्ग सुरु झाल्यानंतर विद्यार्थ्याने प्रवेश रद्द केल्यास वर्ग सुरु झालेल्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल, त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे वर्ष/ सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करुन दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.
- वर्ग सुरु झाल्यानंतर राबविण्यात आलेल्या प्रवेश फेरीद्वारे प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांनी नोंदणी करुन प्रवेश रद्द केल्यास, नोंदणी केलेल्या तारखेच्या महिन्यापासून ज्या महिन्यामध्ये प्रवेश रद्द केला असेल त्या महिन्यापर्यंत दरमहा होणारे वर्ष/सत्र आधारित शिक्षण शुल्क व दरमहा होणारे वसतीगृह शुल्क (वसतीगृह उपलब्ध करुन दिलेले असल्यास) संबंधित विद्यार्थ्याकडून वसूल करण्यात येईल.

## ८. विद्यार्थ्यांची वर्तणूक व शिस्त :

विद्यार्थी रॅगिंग, अपहरण आणि इतर गैरशिस्तीच्या प्रकरणात आढळून आल्यास त्यास पूर्वसूचना न देता विद्यालयातून काढून टाकण्यात येईल. तसेच रॅगिगंच्या नियमानुसार त्यांचेवर कार्यवाही होईल. त्यासाठी विद्यार्थ्यांनी helpline@antiragging.in या साईटवर भेट देऊन रॅगिंगबाबतची संपूर्ण माहिती स्वतः अवगत करुन घ्यावी. प्रत्येक विद्यालयाच्या प्राचार्यांनी प्रत्येक विद्यार्थ्याचे व त्याच्या पालकाचे त्याचा प्रवेश निश्चित झाल्यावर रॅगिंगबाबतचे प्रतिज्ञापत्र ऑनलाईन पध्दतीने www.antiragging.in किंवा www. amanmovement.org या संकेतस्थळावर भरुन घेणे सक्तीचे आहे.

## ९. शिष्यवृत्ती आणि सवलती -

कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रम व्यावसायिक म्हणून घोषित झालेला नाही. त्यामुळे व्यावसायिक अभ्यासक्रमाना लागू असलेल्या शैक्षणिक सवलती (शैक्षणिक शुल्क प्रतिपूर्ति व शिष्यवृत्ती) सद्य अभ्यासक्रमास अनुज्ञेय नाहीत. शासन मान्य भारत सरकार शिष्यवृत्ती (भा.स.शि. )लागू असल्यास तिचा लाभ विद्यार्थ्यांना मिळू शकेल. परंतु विहित कालावधीत भा.स.शि.आवेदन पत्र संबंधित विभागाच्या संकेतस्थळावर भरणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील.

## १०. आरक्षित जागा :

महाराष्ट्र कृषी विद्यापीठे अधिनियम १९८३ मधील तरतुदीनुसार या विद्यापीठांतर्गत सदरील विद्यालयांमध्ये प्रवेशासाठी खालील प्रमाणे जागा आरक्षित ठेवण्यात आलेल्या आहेत.

| अ. क्र. | संवर्ग | आरक्षित जागांची टक्केवारी |
|---|---|---|
| १. | अनुसूचित जाती व नवबौध्द | १३ |
| २. | अनुसूचित जमाती | ७ |
| ३. | अ. विमुक्त जमाती (अ) (१४ व तत्सम जाती) (व्ही.जे.-अे) | ३ |
| | ब. भटक्या जमाती (ब) (जानेवारी १९९० पूर्वीच्या २८ व तत्सम जाती) (एन.टी. -बी) | २.५ |
| | क. भटक्या जमाती (क) (धनगर व तत्सम जमाती) (एन.टी. - सी) | ३.५ |
| | ड. भटक्या जमाती (ड ) (वंजारी व तत्सम जमाती) (एन.टी. -डी ) | २.० |
| ४. | इतर मागास वर्ग (ओ.बी.सी) | १९ |
| ५. | सामाजिक आणि शैक्षणिक मागासवर्गीय (एसईबीसी)* | १० |
| ६. | आर्थिक दुर्बल घटक (इडब्ल्युएस) | १० |
| | **एकूण** | **७०** |
| ७. | शेतकऱ्यांची मुले (अे. जी) | ६ |
| ८. | स्वातंत्र्य सैनिकांची मुले (एफ.एफ) | २ |
| ९. | महाराष्ट्र शासनाच्या प्रकल्प विस्थापित पुर्नवसन अधिनियम १९९६ नुसार प्रकल्प विस्थापित व्यक्ती आणि त्याची मुले (पी.ए.पी) | ४ |
| १०. | आजी व माजी सैनिकांची मुले (डी. पी.) | २ |
| ११. | अपंग/ दिव्यांग (४० टक्के किंवा त्या पेक्षा जास्त अपंगत्व असल्याचे जिल्हा शल्यचिकीत्सालयाचे प्रमाणपत्र आवश्यक) (पी.एच) | ५ |
| १२. | महिला | ३० |
| १३. | अनाथ | १ |

*** वरील आरक्षणामध्ये प्रवेश प्रक्रियेच्या वेळेस प्रचलित शासन निर्णयानुसार बदल संभावतो.**

१०.१ अनुक्रमांक ७ ते १२ या आरक्षणाचा खुला व आरक्षित संवर्गामध्ये समावेश करण्यात आला आहे. तसेच क्र. १३ हे आरक्षण खुल्या प्रवर्गात गुणवत्तेनुसार समाविष्ट राहील.

१०.२ पदवी, पदव्युत्तर व आचार्य पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रियेसंदर्भात शासन निर्णय, कृषी व पदुम विभाग, क्र. मकृवि २०१०/प्र.क्र. १५५ / ७अे, दि.२०/१०/२०११ मध्ये नमूद करण्यात आलेल्या जागांच्या रूपांतराच्या कार्यपध्दतीच्या धर्तीवर कृषि तंत्र पदविका अभ्यासक्रमाच्या रिक्त जागांचे रूपांतर करण्यात येईल.

१०.३ शासन निर्णय क्र. सीबीसी १०/२००६/प्र.क्र.१५/मावक ५, दिनांक ५/६/२००६ अन्वये विमुक्त जाती अ, भटक्या जमाती ब, क, ड त्याचबरोबर इतर मागासवर्गीय आणि विशेष मागास प्रवर्ग व आर्थिक दुर्बक घटक यांनी उपविभागीय अधिकारी यांच्या सही शिक्क्यानिशी क्रिमीलेअर लागू नसल्याचे प्रमाणपत्र सादर करावे. अन्यथा, सदर उमेदवारास त्या प्रवर्गाचे आरक्षण मिळणार नाही. म्हणजेच तो उमेदवार खुल्या प्रवर्गाचा धरला जाईल.

१०.४ इतर आरक्षणांतर्गत अ.क्र. ११ येथील महिलांच्या विशेष आरक्षणास त्या त्या प्रवर्गासाठी विहित करण्यात आलेल्या टक्केवारीनुसार वाटा निश्चितपणे मिळावा यासाठी सामान्य प्रशासन विभाग, परिपत्रक क्र.एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१६-अ, दि.१६/३/१९९९ मध्ये नमूद केलेली कार्यपध्दती अनुसरण्यात येईल.

१०.५ स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलांच्या मुलास प्रवेश देतांना खालील अटीचे पालन काटेकोरपणे करण्यात यावे.

१०.५.१ ज्या विद्यार्थ्यांना प्रवेश द्यावयाचा आहे तो स्वातंत्र्य सैनिकांच्या मुलाचा मुलगा/ मुलगी आहे या विषयी प्रतिज्ञापत्र देण्यात यावे.

१०.५.२ सदरील प्रतिज्ञापत्रात असे विहित करण्यात यावे की,

(अ) नामनिर्देशित करण्याची सवलत यापूर्वी मी कोणत्याही नातेवाईकासाठी वापरली नाही.

(ब) सदरील स्वातंत्र्य सैनिकाच्या नातेवाईकाला प्रवेश सवलती मिळाल्यास यापुढे मी कोणत्याही सवलतीसाठी इतर नातेवाईकांसाठी नामनिर्देशीत करण्याची सवलत वापरणार नाही.

१०.६ महाराष्ट्रातील विविध प्रकल्पामुळे विस्थापित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९७६ यामध्ये उल्लेख केल्याप्रमाणे विस्थापित व्यक्ति व त्यांची मुले/मुली (या जागा भरतांना समसमान गुण असल्यास कृषि विद्यापीठामुळे विस्थापीत झालेल्या व्यक्ती व त्यांची मुले यांना प्राधान्य देण्यात येईल)

## ११. गुणाधिभार

| अ.क्र | बाब | गुण |
|---|---|---|
| १ | तलाठी / पटवारी / डाटाबेस /ई –महासेवा यांनी सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ मध्ये दिलेला शेतजमिनीचा ७/१२ चा उतारा/खसरा(गांव नमुना) उमेदवाराच्या नावावर किंवा त्यांचे आई/वडील किंवा त्याचे आजी/आजोबा यांच्या नावे, यदाकदाचित आई/वडील हयात नसतील, तर सदर उतारा त्याच्या कुटुंब प्रमुखाच्या नावावर असावा किंवा भूमीहीन शेतमजूर. | **१२ टक्के** |
| ब | एन.सी.सी/एम.सी.सी/स्काउट गाईड प्रमाणपत्र असल्यास (तालुका/जिल्हा | **२ टक्के** |

| अ.क्र | बाब | गुण |
|---|---|---|
| | समादेशक/मुख्याध्यापक यांचे प्रमाणपत्र ग्राहय धरले जाईल.) (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यतचे) | |
| क | क्रीडा/सांस्कृतिक नैपुण्य / वादविवाद/ नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास तालुका / जिल्हा स्तरावरील सहभाग (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यतचे) | **२ टक्के** |
| ड | राज्यातील कृषी विद्यापीठाच्या आजी/माजी कर्मचा-यांचा मुलगा/मुलगी असल्यास संबंधित विद्यापीठाच्या कुलसचिव, कार्यालय प्रमुख अथवा नियंत्रक अधिकारी यांचे प्रमाणपत्र. | **३ टक्के** |
| | एकूण अधिभार | **१९ टक्के** |

## १२. कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रमाचे शुल्क

निवड झालेल्या उमेदवारांना प्रवेश घेतेवेळी संबंधित शासकीय/अनुदानित अथवा विना अनुदानित विद्यालयांमध्ये शुल्क भरावे लागेल. अभ्यासक्रमाकरिता निर्धारित केलेल्या शुल्काचा तपशील खालीलप्रमाणे असून ते कृषी परीषदेच्या संमतीने बदलाधीन आहे.

### १२.१ कृषी तंत्र पदविका (२ वर्षे - मराठी माध्यम)

| अ.न | सर्वसाधारण शुल्क | विद्यापीठ/अनुदानित | | विना अनुदानित | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष (रुपये) | द्वितीय वर्ष (रुपये) | प्रथम वर्ष (रुपये) | द्वितीय वर्ष (रुपये) |
| **(अ) शुल्क** | | | | | |
| १ | शिक्षण शुल्क | २०००० | २०००० | ३०००० | ३०००० |
| २ | प्रवेश शुल्क | १००० | १००० | १००० | १००० |
| ३ | नोंदणी शुल्क | ५०० | ५०० | ५०० | ५०० |
| ४ | वाचनालय शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ५ | परीक्षा शुल्क | १२०० | १२०० | १२०० | १२०० |
| | अनामत शुल्क* | १०० | -- | १०० | -- |
| | सत्र शुल्क | १०० | २०० | १०० | २०० |
| | ओळखपत्र शुल्क | १०० | -- | १०० | -- |
| | वैद्यकीय शुल्क | ५० | ५० | ५० | ५० |
| | विद्यार्थी विमा शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ६ | जिमखाना शुल्क | १५० | १५० | १५० | १५० |
| | **एकूण (अ)** | २३,४०० | २३,३०० | ३३,४०० | ३३,३०० |
| **(ब) वसतीगृहात राहु इच्छिणा-या विद्यार्थ्यासाठी फक्त** | | | | | |
| १ | वसतीगृह शुल्क | १००० | १००० | १००० | १००० |

| अ.न | सर्वसाधारण शुल्क | विद्यापीठ/अनुदानित | | विना अनुदानित | |
|---|---|---|---|---|---|
| | | प्रथम वर्ष (रुपये) | द्वितीय वर्ष (रुपये) | प्रथम वर्ष (रुपये) | द्वितीय वर्ष (रुपये) |
| २ | भांडी शुल्क | १०० | १०० | १०० | १०० |
| ३ | खानावळ (खानावळ ठेव)* | १००० | -- | १००० | -- |
| ४ | विद्युत बील आकार | १००० | १००० | १००० | १००० |
| | **एकूण (ब)** | ३१०० | २१०० | ३१०० | २१०० |
| | **एकूण(अ + ब)** | **२६,५००** | **२५,४००** | **३६,५००** | **३५,४००** |
| | *** विद्यार्थ्यांना परत करावयाची रक्कम** | | | | |

**प्रवेश घेतेवेळी विद्यार्थ्याने अभ्यासक्रमाच्या कालावधीत एकाचवेळी भरावयाची रक्कम.**

- वसतीगृह शुल्क, भांडी शुल्क, मेस डिपॉझिट , विद्युत आकार हे प्रवेशाचे वेळी घेण्यात येऊ नये. प्रवेश नियमित झाल्यानंतर उपरोक्त सेवा उपलब्ध असल्यास याबाबतचे शुल्क आकारण्यात यावे. सेवा उपलब्ध नसल्यास शुल्क आकारु नये.
- अनामत रक्कम, मेस डिपॉझिट इ. रक्कमा शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर लगेच विद्यार्थ्यांना परत करण्यात याव्यात.
- विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास संबंधित विषयाकरिता संपूर्ण वार्षिक परीक्षा शुल्क न आकारता संबंधित विषयापुरतेच परीक्षा शुल्क आकारण्यात येईल.
- पदविका अभ्यासक्रम अथवा प्रमाणपत्र अभ्यासक्रम पुर्ण केल्यानंतर विद्यार्थ्यास त्याचा व्यक्तिगत हिशोब तपासून प्रवेशाच्या वेळी त्याने भरलेली अनामत (Caution Money) रक्कम विद्यार्थ्यांना अंतिम गुणपत्रक देते वेळी परत केली जाईल.

## १३. कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रमास उपस्थिती नियम

- कृषी तंत्र पदविका अभ्यासक्रमास विद्यार्थ्याची एकुण ८० टक्के उपस्थिती पुर्ण न करणाऱ्या विद्यार्थ्याला परिक्षेला बसता येणार नाही.

## १४. ऑनलाइन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम, २०२५-२६.

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रिया विवरण | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात | **०३/०६/२०२५** |
| २ | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | **०१/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ३ | तात्पुरती गुणवत्ता यादी व **रद्द अर्जाची यादी** प्रसिध्द करण्याचा दिनांक | **०४/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ४ | ऑनलाईन हरकत निवारण नोंदणीचा अंतिम दिनांक | **०५ - ०९/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ५ | हरकत निवारण समितीची बैठक | **११/०७/२०२५** |
| ६ | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **१५/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ७ | जिल्हानिहाय व विद्यालयनिहाय गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **१६/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ८ | **पहिल्या प्रवेश फेरीच्या** जिल्हानिहाय वाटप यादीची प्रसिध्दी दिनांक | **१८/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ९ | संबंधित विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | **२१ ते २२/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| १० | **दुस-या प्रवेश फेरीच्या** वाटप यादीची प्रसिध्दी **(रुपांतरासह/जिल्हानिहाय)** | **२४/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ११ | संबंधित विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | **२५ ते २६/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| १२ | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | **२८/०७/२०२५** |
| १३ | **विदर्भस्तरीय** गुणवत्ता यादीनुसार घटक विद्यालयस्तरावर / विद्यापीठस्तरावर भरावयाच्या रिक्त जागांच्या तपशिलाची संकेतस्थळावर प्रसिध्दी | **२८/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| १४ | रिक्त जागांकरिता **'जागेवर प्रवेश फेरी'** (विद्यापीठाचे घटक कृषि तंत्र विद्यालय स्तरावर) | **३०/०७/२०२५ ते ०१/०८/२०२५** |

## प्रवेशाकरिता तपासवयाच्या कागदपत्रांची सूची (Check List)

| अ.क्र | प्रमाणपत्र /कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (X) |
|---|---|---|
| १ | सक्षम प्राधिका-याचे अधिवास प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील जन्म ठिकाणाचा उल्लेख असलेले महाविद्यालय / शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र राज्यातील सक्षम प्राधिका-याकडील जन्म दाखला/ **जिल्हा निश्चिती करिता रहिवाशी प्रमाणपत्र.** | |
| २ | माध्यमिक शालान्त (इयत्ता १० वी) गुणपत्रक व प्रमाणपत्र | |
| ३ | ज्या विद्यालयातून शेवटची परीक्षा उत्तीर्ण आहे, त्या विद्यालयाचा शाळा सोडल्याचा दाखला किंवा उमेदवाराने इतर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतला असेल तर त्या विद्यालयाचे/महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट (Bonafide Certificate). | |
| ४ | राज्यातील पदनिर्देशित सक्षम प्राधिका-याने दिलेले 'जात प्रमाणपत्र' | |
| ५ | तहसीलदार, तालुका दंडाधिकारी अथवा विशेष कार्यकारी दंडाधिकारी यापेक्षा कमी दर्जा नसलेल्या सक्षम अधिका-यांनी दिनांक १.०४.२०२४ **रोजी किंवा त्यानंतर दिलेले किंवा ज्या दिनांकास प्रवेश अर्ज दिला असेल, त्या दिनांकास ग्राहय असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे** (नॉन क्रिमिलेअर) प्रमाणपत्र | |
| ६ | उम्मेदवाराचे आई/वडील किंवा आजी/आजोबा 'स्वातंत्र्यसैनिक' असल्याबाबतचे मा. पंतप्रधान /मा. मुख्यमंत्री यांची सही असलेले प्रमाणपत्र. | |
| | **स्वातंत्र्यसैनिक / सैनिकाच्या पती / पत्नीचे / नामनिर्देशित व्यक्ती** यांचे खालील प्रमाणे रुपये १००/- चे स्टॅम्पपेपरवरील प्रतिज्ञापत्र.<br>• उमेदवार हा स्वातंत्र्यसैनिकाच्या मुलाचा/मुलीचा, मुलगा/मुलगी आहे.<br>• स्वातंत्र्यसैनिकाने हया सवलतीचा उपयोग यापूर्वी कुठल्याही नातेवाईकासाठी केलेला नाही.<br>• स्वातंत्र्यसैनिकाने हया सवलतीचा जर आता उपयोग केला तर पुढे करणार नाही. | |
| ८ | उमेदवाराचे वडील अथवा उमेदवार स्वतः सैनिक असल्यास संबंधित सैन्याधिकारी /जिल्हासैनिक बोर्डाचे अधिकारी यांचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र किंवा Discharge Certificate ची प्रत. | |
| ९ | अपंग/दिव्यांग प्रवर्गासाठी उमेदवाराचे ४० टक्के किंवा त्यापेक्षा जास्त अपंगत्व असल्याबाबतचे जिल्हा शल्यचिकित्सक / वैद्यकीय मंडळाचे प्रमाणपत्र. | |
| १० | महाराष्ट्रातील जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी उमेदवार/वडील हे प्रकल्पग्रस्त | |

| अ.क्र | प्रमाणपत्र /कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (X) |
|---|---|---|
| | आहेत व त्याचे /तिचे वडिलांची/ पालकांची किंवा आजोबांची शेतजमीन महाराष्ट्रातील कृषी विद्यापीठे/ पाटबंधारे / वीज / संरक्षण प्रकल्प या विभागासाठी संपादित केलेली/झालेली आहे, असे प्रमाणित केलेले प्रमाणपत्र. सक्षम अधिकाऱ्याने दिलेल्या प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्रावर या सवलतीचा फायदा ज्यांना द्यायचा आहे, त्याच्या नावाचा उल्लेख असणे आवश्यक आहे. | |
| ११ | उमेदवार किंवा त्याचे माता-पिता किंवा आजा-आजी (पित्याकडून) शेतजमिनीचे मालक किंवा कूळ म्हणून शेतजमीन धारक आहे / आहेत आणि त्यांचे उत्पन्नाचे मुख्य साधन जमिनीच्या वैयक्तिक मशागतीतून आहे हे दर्शविणारे तहसिलदार / नायब तहसिलदारापेक्षा कनिष्ठ दर्जा नसलेल्या अधिकाऱ्याचे विहित नमुन्यातील / तहसीलदार किंवा नायब तहसीलदार यांनी दिलेले त्यांच्याकडील उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यामध्ये सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ या वर्षातील **'शेतकरी असल्याबाबतचे प्रमाणपत्र (एजी)'. (परिशिष्ट-बी)** | |
| १२ | **(i)** उमेदवाराच्या नावे किंवा माता-पिता / आजोबा-आजीच्या नावे शेतजमीन आहे, हे दर्शविणारा तलाठी / पटवारी याने दिलेला **सन २०२४-२५ किंवा २०२५-२६ वर्षाचा गाव ७/१२ उतारा.**<br>(ii) आई / वडील हयात नसल्यास त्याच्या कुटुंब प्रमुख्याच्या नावावरील ७/१२ उतारा व कुटुंब प्रमुखाचे **रु.१००/- च्या मुद्रांकावर प्रतिज्ञापत्र.**<br>(iii) उमेदवाराच्या आईच्या वडिलोपार्जित शेतजमिनीमध्ये तिचा हिस्सा असेल तर आईच्या पित्याचे रु.१००/-च्या (शंभर रूपये फक्त) मुद्रांकावर केलेले शपथपत्र. | |
| १३ | उमेदवाराच्या माता / पित्याचे उपजिविकेचे मुख्य साधन शेतजमिनीवरील शारीरिक श्रमाचे आहे, असा उल्लेख असणारे तहसिलदार / नायब तहसिलदाराचे **'भूमिहीन शेतमजुराचे प्रमाणपत्र'** (असे प्रमाणपत्र अर्जदाराच्या नावे नसावे.) तथापि, **अशा उमेदवारास 'शेतकरी' (एजी) प्रवर्ग लागू असणार नाही. (परिशिष्ट-अे)** | |
| १४ | राष्ट्रीय छात्र सेना (एन.सी.सी.) प्रमाणपत्र, हवाईदल/नौदल/स्थल सेना विभागाचे सक्षम अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा स्कॉऊट गाईड तालुका समादेशक /मुख्याध्यापक/प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र किंवा महाराष्ट्र छात्र सेना (एम.सी.सी.) जिल्हा समादेशक अधिकारी/मुख्याध्यापक /प्राचार्य यांनी दिलेले प्रमाणपत्र. | |
| १५ | तालुका किंवा जिल्हा पातळीवरील तालुका/जिल्हा क्रीडा अधिकाऱ्याने निर्गमित केलेले इयत्ता १० वी पर्यंतचे प्रमाणपत्र. नोंदणीकृत क्रीडा असोशिएशनने प्राधिकृत केलेल्या क्रीडा स्पर्धेचे तालुका / जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असलेले प्रमाणपत्र. | |

| अ.क्र | प्रमाणपत्र /कागदपत्रांचा तपशील | आहे (√) / नाही (X) |
|---|---|---|
| | | |
| १६ | राज्यातील उमेदवाराचे पालक कृषी विद्यापीठे/कृषी परिषदेचे आजी/माजी अथवा मृत सेवक असल्यास संबंधित कार्यालय प्रमुख किंवा नियंत्रण अधिका-याचे प्रमाणपत्र. | |
| १७ | सांस्कृतिक नैपुण्य/वादविवाद/नाटक इत्यादी स्पर्धेमध्ये भाग घेतला असल्यास तालुका/जिल्हा स्तरावरील सहभाग (इयत्ता ८ वी ते १० वी पर्यतचे ) प्रमाणपत्र. | |
| १८ | सेवेत असलेले उमेदवार असल्यास संबंधित कार्यालय प्रमुखाचे ना हरकत प्रमाणपत्र. (No Objection Certificate) | |
| १९ | कागदपत्रांच्या प्रतींविषयी स्वयं घोषणापत्र **(परिशिष्ट-सी)** | |
| २० | महिला व बालविकास विभाग, शासन निर्णय क्र. अमुजा २०११/प्र.क्र.२१२/का-३, दि.२/४/२०१८ अन्वये आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या छापील लेटरहेड वरील उपायुक्त (बालविकास), पुणे / आयुक्त, महिला व बालविकास, पुणे यांच्या स्वाक्षरीचे अनाथ प्रमाणपत्र. | |
| २१ | जर शाळा सोडल्याचा मूळ दाखला हरविला आहे व परंतु त्यांनी द्वितीय प्रतीवर प्रवेश घेतलेला असल्यास सदरचे शपथपत्र मा. तहसिलदार यांच्या समोर रु.१००/-च्या (शंभर रूपये फक्त) मुद्रांकावर केलेले सादर करणे बधणकारक आहे. **(परिशिष्ट -डी)** | |
| २२ | उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सादर केले नाही. त्यांनी उपरोक्त निवेदन रु.१००/-च्या (शंभर रूपये फक्त) मुद्रांकावर केलेले सादर करणे बधणकारक आहे. **(परिशिष्ट -इ)** | |

# ऑनलाइन केंद्रीय प्रवेश प्रक्रिया कार्यक्रम, २०२५-२६.

| अ.क्र. | प्रवेश प्रक्रिया विवरण | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेची सुरुवात | **०३/०६/२०२५** |
| २ | ऑनलाईन प्रवेश अर्ज व त्यासोबतची आवश्यक ती स्कॅन केलेली कागदपत्रे संकेतस्थळावर अपलोड करावयाचा अंतिम दिनांक | **०१/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ३ | तात्पुरती गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **०४/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ४ | **ऑनलाईन हरकत निवारण** नोंदणीचा अंतिम दिनांक | **०५ - ०९/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ५ | हरकत निवारण समितीची बैठक | **११/०७/२०२५** |
| ६ | अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **१५/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ७ | जिल्हानिहाय व विद्यालयनिहाय गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्याचा दिनांक | **१६/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ८ | **पहिल्या प्रवेश फेरीच्या** जिल्हानिहाय वाटप यादीची प्रसिध्दी दिनांक | **१८/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ९ | संबंधित विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | **२१ ते २२/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| १० | **दुस-या प्रवेश फेरीच्या** वाटप यादीची प्रसिध्दी **(रुपांतरासह/जिल्हानिहाय)** | **२४/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| ११ | संबंधित विद्यालयात उपस्थित राहून प्रवेश घेण्याचा अंतिम दिनांक | **२५ ते २६/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| १२ | वर्ग सुरु होण्याचा दिनांक | **२८/०७/२०२५** |
| १३ | **विदर्भस्तरीय** गुणवत्ता यादीनुसार घटक विद्यालयस्तरावर / विद्यापीठस्तरावर भरावयाच्या रिक्त जागांच्या तपशिलाची संकेतस्थळावर प्रसिध्दी | **२८/०७/२०२५ (सायं. ५.३० पर्यंत)** |
| १४ | रिक्त जागांकरिता **'स्थळ प्रवेश फेरी'** (विद्यापीठाचे घटक कृषि तंत्र विद्यालय स्तरावर) | **३०/०७/२०२५ ते ०१/०८/२०२५** |

**कुलसचिव**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ,**
**अकोला**